PlanetRead
Literacy for a Billion

Movie: Pinjara
Year: 1972

Song: Aali Thumkat Naar Lachkat
Lyricist: Jagdish Khebudkar

गं साजणी...
कुण्या गावाची कंच्या नावाची
कुण्या राजाची तू गं राणी
गं...
आली ठुमकत नार लचकत
मान मुरडत हिरव्या रानी
आली ठुमकत नार लचकत
मान मुरडत हिरव्या रानी
आली ठुमकत नार लचकत
मान मुरडत हिरव्या रानी
आली ठुमकत नार लचकत
मान मुरडत हिरव्या रानी

खुळुखुळु घुंगराच्या
तालावर झाली दंग
तालावर झाली दंग
शालू बुट्टेदार
लई लई झाला तंग
लई लई झाला तंग
हे हे...
सोसना भार
घामाघुम झालं अंग
घामाघुम झालं अंग
गोऱ्या रंगाची न्याऱ्या ढंगाची
चोळी भिंगाची ऐन्यावानी
गं...
आली ठुमकत नार लचकत
मान मुरडत हिरव्या रानी
आली ठुमकत नार लचकत
मान मुरडत हिरव्या रानी

डाळिंबाचं दाणं तुझ्या
पिळलं गं व्हटावरी
पिळलं गं व्हटावरी
गुलाबाचं फूल तुझ्या
चुरडलं गालावरी
चुरडलं गालावरी
कबूतर येडं खुळं
फिरतंया भिरी भिरी
फिरतंया भिरी भिरी
तुझ्या नादानं झालो बेभान
जीव हैराण येड्यावानी
गं...
आली ठुमकत नार लचकत
मान मुरडत हिरव्या रानी
आली ठुमकत नार लचकत
मान मुरडत हिरव्या रानी

कवळयात घेऊनिया
अलगद उचलावं
अलगद उचलावं
मऊ मऊ हिरवाळीत
दहिवरात भिजवावं
दहिवरात भिजवावं
पिरतीचं बेणं तुझ्या
काळजात रूजवावं
काळजात रूजवावं
लाडीगोडीनं पुढल्या ओढीनं

Literacy for a Billion

राहू जोडीनं राजा रानी
गं...
आली ठुमकत नार लचकत
मान मुरडत हिरव्या रानी
आली ठुमकत नार लचकत
मान मुरडत हिरव्या रानी

गं साजणे...
साजणे... गं...
साजणे...
साजणे साजणे गं...
अगं साजणे साजणे गं...
अगं साजणे साजणे गं...

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*